सातारा न्यूज
निर्भीड व निष्पक्ष बातमी देणारं एकमेव व्यासपीठ
http://esataranews.com sataranewsonline @SataraNews sataranews

# विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेची जागरूकता

## केंब्रिज इंटरनॅशनल इंग्लिश मिडियम स्कूल, वाडे येथे मार्गदर्शन सत्र

सातारा न्यूज;
सातारा : डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी सजग राहणे काळाची गरज आहे. याच हेतूने सायबर शिक्षा -सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी केंब्रिज इंटरनॅशनल इंग्लिश मिडियम स्कूल, वाडे, सातारा येथे सायबर सुरक्षा जनजागृती सत्र आयोजित करण्यात आले.

या सत्राचे आयोजन कर्मवीर भाऊराव पाटील इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, वर्ये (सातारा) यांच्या विद्यार्थिनी पूजा शिंदे व दिया सकुंडे यांनी,



क्विक हील फाऊंडेशनच्या सहकार्याने केले. शाळेच्या प्राचार्या श्रीमती रोहिणी .आर. चव्हाण यांचीही या वेळी उपस्थिती होती.या जनजागृती सत्रात विद्यार्थ्यांना सायबर फ्रॉडची उदाहरणे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, ऑनलाईन खरेदीतील सुरक्षितता आणि डिजिटल साधनांचा जबाबदारीने वापर या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे विद्यार्थी दैनंदिन जीवनात इंटरनेटचा सुरक्षित वापर कसा करावा याची उपयुक्त माहिती मिळाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. एस. सावंत, विभागप्रमुख डॉ. आर. डी. कुंभार आणि श्रीमती पी. ए. लोखंडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षिततेबद्दल जागरूकता निर्माण करून भविष्यातील सायबर जोखमींपासून बचाव करण्यास निश्चितच उपयोगी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.